SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
7304904149

# धनत्रयोदशी - अश्विन कृष्ण १३

कथेनुसार, राजा बळीच्या भयापासून देवांना मुक्त करण्यासाठी भगवान विष्णू वामन अवतार घेऊन राजा बळीच्या यज्ञस्थानी पोहोचले. शुक्राचार्यांनीही भगवान विष्णूंना वामनाच्या रूपात ओळखले आणि राजा बळीला वामनाने जे काही मागितले ते नाकारण्याची विनंती केली. वामन हा भगवान विष्णूंचा अवतार आहे. जो तुमच्याकडून सर्व काही हिसकावून घेण्यासाठी देवांना मदत करण्यासाठी आला आहे असे त्यांनी सांगितले होताभारतीय संस्कृतीत आरोग्याला संपत्ती बरोबर मानले गेले आहे. ‘पहिले सुख निरोगी शरीर, दुसरे सुख पैसा ही म्हण आजही प्रचलित आहे. म्हणूनच दिवाळीत धनत्रयोदशीला  पहिले महत्त्व दिले जाते. जे भारतीय संस्कृतीनुसार पूर्णपणे योग्य आहे. शास्त्रात नमूद केलेल्या कथांनुसार, समुद्रमंथनाच्या वेळी कार्तिक कृष्ण त्रयोदशीच्या दिवशी भगवान धन्वंतरी हातात अमृताचे भांडे घेऊन प्रकट झाले. भगवान धन्वंतरी हा विष्णूचा अवतार असल्याचे मानले जाते. जगात वैद्यकशास्त्राचा विस्तार आणि प्रसार व्हावा यासाठी भगवान विष्णूंनी धन्वंतरीचा अवतार घेतला. धनत्रयोदशीचा सण भगवान धन्वंतरीच्या रूपाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.धनत्रयोदशीच्या दिवशी धन्वंतरी देव, कुबेर महाराज आणि माता लक्ष्मीची पूजा केलीजाते. या दिवशी सोने, चांदी, भांडी, मालमत्ता, वाहने, पुस्तके, दागिनेइत्यादी खरेदी करणे अत्यंत फलदायी मानले जाते.

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

असे म्हटले जाते की या दिवशी खरेदी केलेल्या वस्तू दीर्घकाळ समृद्धी प्रदान करतात.

धनत्रयोदशीला काय करावे?

धनत्रयोदशीच्या दिवशी आपल्या क्षमतेनुसार चांदी आणि इतर धातू कोणत्याही स्वरूपात खरेदी करणे खूप शुभ आहे.

धनप्राप्तीसाठी घरातील पूजास्थानी कुबेरासाठी दिवा दान करा आणि मृत्यूमुखी भगवान यमराजासाठी मुख्य दरवाजावर दिवा दान करा.

धनत्रयोदशीशी संबंधित अशी कथा आहे की, कार्तिक कृष्ण त्रयोदशीच्या दिवशी भगवान विष्णूने देवतांच्या कार्यात अडथळा आणल्याबद्दल दानवांचे गुरु शुक्राचार्य यांचा एक डोळा फाडला होता. अशी आहे पौराणिक कथाकथेनुसार, राजा बळीच्या भयापासून देवांना मुक्त करण्यासाठी भगवान विष्णू वामन अवतार घेऊन राजा बळीच्या यज्ञस्थानी पोहोचले. शुक्राचार्यांनीही भगवान विष्णूंना वामनाच्या रूपात ओळखले आणि राजा बळीला वामनाने जे काही मागितले ते नाकारण्याची विनंती केली.वामन हा भगवान विष्णूंचा अवतार आहे जो तुमच्याकडून सर्व काही हिसकावून घेण्यासाठी देवांना मदत करण्यासाठी आला आहे असे त्यांनी सांगितले.बळीने शुक्राचार्यांचे म्हणणे ऐकले नाही. वामनाने परमेश्वराने मागितलेल्या कमंडलातून तीन पावले जमीन आणि जल दान करण्याचा संकल्प करू लागला.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

बळीला दान करण्यापासून रोखण्यासाठी शुक्राचार्यांनी राजा बळीच्या कमंडलमध्ये लघुरूपात प्रवेश केला. त्यामुळे कमंडलातून बाहेर पडणाऱ्या पाण्याचा मार्ग बंद झाला होता.वामनला भगवान शुक्राचार्यांची युक्ती समजली. भगवान वामनांनी आपल्या हातातील कुशाला कमंडलमध्ये अशा प्रकारे ठेवले की शुक्राचार्यांच्या एका डोळा फुटला. शुक्राचार्य कमंडलातून संघर्ष करत बाहेर आले. यानंतर बळी तीन पाऊल जमीन दान करण्यासाठी तयार झाला.

त्यानंतर भगवान वामनांनी एका पायाने संपूर्ण पृथ्वी आणि दुसऱ्या पायाने जागा मोजली. तिसरी पायरी ठेवायला जागा नसल्याने बळीने वामनाच्या चरणी डोके ठेवले. बालिदनात सर्वस्व गमावले. अशा रीतीने देवतांची बळीच्या भीतीपासून मुक्तता झाली आणि बळीने त्यांच्याकडून जितकी संपत्ती हिसकावून घेतली होती त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक संपत्ती देवांना मिळाली. धनत्रयोदशीचा सणही यानिमित्ताने साजरा केला जातो.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

दीपावलीला जोडून येणाऱ्या या सणाच्या निमित्ताने नवीन सुर्वणालंकार विकत घेण्याची प्रथा आहे. व्यापारीवर्ग आपल्या तिजोरीचे पूजनही याच दिवशी करतात. धनत्रयोदशी म्हणजेच देवतांचा वैद्य 'धन्वंतरी देवता. ' ज्यामुळे आपल्या जीवनाचे पोषण सुरळीत चालू आहे, त्या धनाची या दिवशी पूजन करतात. येथे 'धन' म्हणजे शुद्ध लक्ष्मी. श्रीसूक्तात वसू, जल, वायू, अग्नी आणि सूर्य यांना धनच म्हटले आहे.

ज्या धनाला खरा अर्थ आहे, तीच खरी लक्ष्मी ! अन्यथा अलक्ष्मीमुळे अनर्थ घडतो.हा दिवस व्यापारी लोकांसाठी विशेष महत्त्वाचा मानला जातो; कारण धनप्राप्तीसाठी श्री लक्ष्मीदेवीचे पूजन केले जाते.या दिवशी ब्रह्मांडात श्री लक्ष्मीदेवीचे तत्त्व प्रक्षेपित होत असते. त्यामुळे जिवाला श्री लक्ष्मीदेवी आणि नारायण यांची कृपा संपादन करता येते.

ती कृपा जिवाच्या भावावर टिकून राहाते. आताच्या काळात साधकांना शक्तीची आवश्यकता आहे, तसेच व्यावहारिक सुखापेक्षा जगणे आणि आयुष्य टिकवणे महत्वाचे आहे. त्यामुळे साधना करणाऱ्या जिवासाठी हा दिवस 'महापर्वणी' समजला जातो. या दिवसाला बोलीभाषेत 'धनतेरस ' असे म्हटले जाते. या दिवशी व्यापारी तिजोरीचे पूजन करतात. व्यापारी वर्ष दिवाळी ते दिवाळी असे असते. नव्या वर्षाच्या हिशोबाच्या वह्या या दिवशीच आणून त्यांचे पूजन करून वापरात आणल्या जातात.

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

धनत्रयोदशीच्या दिवशी नवीन सुवर्ण विकत घेण्याचा प्रघात आहे. त्यामुळे वर्षभर घरात धनलक्ष्मी वास करते. वास्तविक लक्ष्मीपूजनाच्या वेळी वर्षभराचा आयव्यय (जमाखर्च) द्यायचा असतो. त्या वेळी धनत्रयोदशीपर्यंत शिल्लक राहिलेली संपत्ती प्रभुकार्यासाठी व्यय केल्यास सत्कार्यात धन व्यय झाल्यामुळे धनलक्ष्मी शेवटपर्यंत लक्ष्मीरूपाने रहाते. धन म्हणजे पैसा. हा पैसा घामाचा, कष्टाचा, धवलांकित असलेला आणि वर्षभरात पै-पै करून जमा केलेला असावा. या पैशाचा न्यूनतम १/६ भाग प्रभुकार्यासाठी व्यय करावा, असे शास्त्र सांगते.’

या दिवशी श्री विष्णूच्या अप्रकट शक्तीच्या आधारे श्री लक्ष्मीची उजवी नाडी कार्यरत होऊन त्यातून उत्पन्न होणाऱ्या तेजतत्वात्मक लहरी वेगाने ब्रह्मांडाकडे झेप घेतात. लक्ष्मीतत्वाच्या उजव्या नाडीच्या कार्यरत अवस्थेमुळे या दिवशी संपूर्ण ब्रह्मांडातील वायूमंडल हे सोन्यासारख्या चमचमणाऱ्या सोनेरी कणांनी उजळून निघालेले असते. या चमचमणाऱ्या सोनेरी कणांतील श्री लक्ष्मीचे चैतन्य जिवाला मायेतील ऐश्वर्य प्रदान करून त्याच्या साधनेसाठी पोषक वातावरण निर्माण करते; म्हणून या दिवशी धनाच्या रूपात श्री लक्ष्मीची मनोभावे पूजा केली जाते. श्री लक्ष्मीच्या भावपूर्ण पूजेमुळे प्रत्यक्ष धनाच्या अधिपतीचे, म्हणजेच कुबेराचे पृथ्वीच्या कक्षेत आगमन होते.

पूर्वी राजे वर्षाच्या शेवटी आपला खजिना सत्पात्री दान करून खाली करायचे. तेव्हा त्यांना धन्यता वाटायची. यामुळे जनता आणि राजा यांच्यातील संबंध हे कौटुंबिक स्वरूपाचे होते. राजाचा खजिना हा जनतेचा असून राजा त्याचा केवळ सांभाळ करणारा आहे. त्यामुळे जनता कर देतांना आडकाठी न करता देत असे. त्यामुळे साहजिकच परत खजिना भरत असे. 'सत्कार्यासाठी धनाचा विनियोग झाल्यामुळे आत्मबलही वाढत असे. 'धन्वंतरीचा जन्म देव आणि राक्षस यांनी केलेल्या समुद्रमंथनातून झाला. चार हात असलेला भगवान धन्वंतरि एका हातात 'अमृत कलश' , दुसऱ्या हातात 'जळू' , तिसऱ्या हातात 'शंख' आणि चौथ्या हातात 'चक्र' घेऊन जन्माला आला. (समुद्रमंथनातून बाहेर आला.) या चारही हातांतील गोष्टींचा उपयोग करून अनेक व्याधींना, रोगांना बरे करण्याचे काम भगवान धन्वंतरि करतो.'वैद्य मंडळी या दिवशी धन्वंतरीचे (देवांचा वैद्य) पूजन करतात. कडुनिंबाच्या पानांचे बारीक केलेले तुकडे आणि साखर असे 'प्रसाद' म्हणून लोकांना देतात. यात मोठा अर्थ आहे. कडुनिंबाची उत्पत्ती अमृतापासून झाली आहे. धन्वंतरि हा अमृततत्व देणारा आहे, हे त्यातून प्रतीत होते. कडुनिंबाची पाच-सहा पाने प्रतिदिन खाल्ली, तर व्याधी होण्याची शक्यता नाही. एवढे कडुनिंबाचे महत्त्व आहे; म्हणून या दिवशी तोच धन्वंतरीचा प्रसाद म्हणून देण्यात येतो.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
PAN ABPCS9450D
7304904149

‘धनत्रयोदशीला श्री लक्ष्मीतत्व पृथ्वीवर मोठ्या प्रमाणात येते. या दिवशी श्री लक्ष्मीची पूजा करतांना सध्या लोक पैसे (नाणी, नोटा), दागिने या स्वरूपात करतात. या कारणाने श्री लक्ष्मीची कृपा खऱ्या अर्थाने त्यांना प्राप्त होत नाही. केवळ स्थूल धनाचे पूजन करणारा जीव मायेच्या पाशात अडकतो आणि ‘साधना करून मोक्षमिळवणे’ , हा मनुष्यजन्माचा मूळ उद्देश विसरतो. या दिवशी श्री लक्ष्मीचे ध्यान आणि शास्त्र संमत पद्धतीने पूजन करणे अपेक्षित असते.

कुबेराचा ध्यानमंत्र पुढीलप्रमाणे आहे.

ॐ धनदाय नमस्तुभ्यं निधिपद्माधिपाय च ।

भवंतु त्वत्प्रसादान्मे धनधान्यादिसंपदः ।।

धनत्रयोदशीला धनाचे, धन्वंतरीचे आणि लक्ष्मीचे पूजन जेवढे महत्त्वाचे तेवढेच यमदीपदानही महत्त्वाचे, त्याबद्दल जाणून घेऊ

धनत्रयोदशीला 'यमदीपदान'

मृत्यूचे भय प्रत्येकाला वाटत असते. त्यातही अकाली मृत्यूचे भय जास्तच असते. मृत्यू कधी, कसा येईल हे कोणीच सांगू शकत नाही. परंतु, तो कसा येऊ नये, यासाठी आपण प्रार्थना नक्कीच करू शकतो. त्यासाठीच शास्त्रात धनत्रयोदशीच्या दिवशी यमराजाला दीपदान केले जाते.

FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

कसे करावे दीपदानः

मृत्यूची देवता यमराज हे दक्षिण दिशेचे स्वामी आहेत. त्यांच्यासाठी धनत्रयोदशीच्या दिवशी . सायंकाळी कणकेच्या पिठाचा (गव्हाचे पीठ) ऐका वातिचा तेलाचा दीवा दक्षिणेस ज्योत करून ठेवावा अनन्यभावे तो दिवा यमराजांना अर्पण करून अकाली मृत्यू येऊ नये, म्हणून अशी प्रार्थना करावी.

मंत्र= मृत्युना पाशदंडाभ्यां कालेन श्यामयासह । त्रयोदश्यां दीपदानात् सूर्यजः प्रीयतां मम ॥ हा श्लोक म्हणून दिव्याला नमस्कार करावा.१) यमंतर्पयामि २) धर्मराजं ३) मृत्युं ४) अंतकं ५) वैवस्वतं ६) कालं ७) सर्वभूतक्षयकर ८) औदुंबरं ९) दध्नं १०) नीलं ११) परमेष्ठिनं १२) वृकोदरं १३) चित्रं १४) चित्रगुप्तं तर्पयामि।

नंतर दक्षिणेकडे तोंड करून पुढील श्लोक दहा वेळा म्हणावा.

- मंत्र= यमोनिहंता पितृधर्मराजो वैवस्वतो दंडधरश्च कालः । भूताधिपो दत्त कृतानुसारी कृतांत एतद्दशभिर्जपंति ।।

यमदीपदान धनत्रयोदशीलाच का केले जाते, या संदर्भात पौराणिक कथाःहंसराज नावाचा एक राजा होता. तो एकदा आपल्या सैनिकांसह शिकारीसाठी गेला होता. शिकारीच्या शोधात राजाची आणि सैन्याची ताटातूट झाली.

राजा भरकटत दुसऱ्या राज्यात पोहोचला. तिथला राजा हेमराज याच्यासमोर हंसराज राजाने आपली ओळख दिली. हेमराजनेही हंसरंजाचे आदरातिथ्य केले. त्याचवेळेस हेमराजाला पुत्रप्राप्ती झाली.

आणि त्या आनंदात त्याने हंसराजाला आणखी काही दिवस राहण्याची विनंती केली.तेजस्वी बाळाचे भाकीत वर्तवण्यासाठी राजज्योतिष आले.

सर्व जण उत्सुकतेने भविष्य ऐकत होते. मात्र एका क्षणी ज्योतिष थांबले आणि राजाला म्हणाले, राजन, तुझा पुत्र अतिशय पराक्रमी होईल, मात्र युवावस्थेत त्याच्या विवाहाच्या अवघ्या चार दिवसांनी त्याचा मृत्यू होईल.हे भाकीत ऐकून हेमराज अस्वस्थ झाला. हंसराजाने आपल्या कर्तृत्वाच्या बळावर बाळाची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली आणि त्याला अकाली मृत्यू येऊ देणार नाही, असा शब्द दिला. त्यानुसार हंसराज, बाळाला घेऊन आपल्या राज्यात गेला. त्याचे राजकुमारासारखे पालनपोषण केले. ज्योतिषांनी केलेल्या भाकितानुसार राजकुमार शूर, पराक्रमी आणि महातेजस्वी बनला. त्याची कीर्ती सर्वत्र पसरली. आपणहून त्याला विवाहाचे प्रस्ताव येऊ लागले. एका सुंदर राजकुमारीशी त्याचा विवाह देखील झाला. सर्वजण आनंदात असताना हंसराजाला राजज्योतिषांनी केलेली भविष्यवाणी आठवली. त्याने कडेकोट बंदोबस्त केला.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895 PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com 7304904149

विवाहाच्या चौथ्या दिवशी दैव गतीनुसार यमदूत राजकुमाराला यमसदनाला नेण्यासाठी आले. परंतु हा लक्ष्मी नारायणासारखा जोडा पाहून तेदेखील हरखून गेले. त्या राजकुमाराला अभय द्यावे, असा विचार त्यांच्या मनात आला.

यमराजांना ही बाब कळणार नाही, याची त्यांनी खबरदारी घेतली. परंतु, यमराजांना ही बातमी कळली, त्यांनी यमदूतांना बोलावून घेतले आणि त्यांच्याकडून असे काही घडले असल्यास कबुली जवाब मागितला. त्यांना शिक्षा देणार नाही, या बोलीवर बोलते केले आणि सत्य वदवून घेतले, यमदूतांच्या सांगण्यानुसार खुद्द यमदेवांनी देखील राजकुमार आणि राजकुमारीचा नवा संसार पाहिला आणि त्यांचेही हृदय द्रवले.

यमराज म्हणाले, 'आपण सगळेच जण कर्तव्याने बांधील आहोत. मृत्यू अटळ आहे, तो कोणीच टाळू शकत नाही. परंतु, जे कोणी कार्तिक कृष्ण त्रयोदशीला धन्वंतरीची पूजा झाल्यावर आत्मज्योतीच्या रक्षणार्थ मलाही दीपदान करतील, त्यांना अकाली मृत्यू येणार नाही.

कथेतील सत्यासत्यता पडताळत राहण्यापेक्षा श्रद्धेने एक दिवा यमराजांना समर्पित केला, तर आपल्याला अकाली मृत्यू येणार नाही, हा दिलासा नक्कीच मिळू शकेल.

SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION
श्री सद्गुरु कृपा वैदिक फाउंडेशन
FLAT NO 2, KALPANA NIWAS, TIRANDAJ VILLAGE, SAINATH NAGAR RD, NEAR DIVINE SOC, IIT MAIN GATE, POWAI, MUMBAI 400076
CIN U88900MH2025NPL445895
PAN ABPCS9450D
shreesadgurukrupa.foundation@gmail.com
7304904149

# बँक डीटेल्स

## G-PAY

Shree sadguru Foundation

UPI ID: shreesadgurukrupa.foundation@okaxis

Scan to pay with any UPI app

IDFC FIRST Bank

SCAN & PAY

UPI ID: shreesadguru1@idfcbank

| | |
|---|---|
| **Name** | SHREE SADGURU KRUPA VAIDIK FOUNDATION |
| **Account Number** | 10227556284 |
| **IFSC** | IDFB0040156 |
| **SWIFT Code** | IDFBINBBMUM |
| **Bank Name** | IDFC FIRST |
| **Branch** | POWAI BRANCH |